कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नगरपरिषद दुबे रुग्णालय ईमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व) कुळगांव, पिन-४२१५०३, ता.अंबरनाथ जि.ठाणे.
ईमेल:- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in, वेबसाईट:- http://kbmc.gov.in

संदर्भ :क्र.कुबनप/नरवि/ ३६४८ /२०१८-२०१९ दिनांक : २७/०५/२०१८

प्रति,
श्री.रितेश विरेंद्र रामचरित्र मिश्रा व इतर दोन
द्वारा श्री.मुकेश मोरे (वास्तुशिल्पकार) कुळगांव-बदलापूर.

विषय :- सुरु असलेल्या बांधकामात बदल करण्याच्या खुलासा बाबत.
गट.नं.१२ हि.नं.१ पैकी, मौजे सोनिवली ता.अंबरनाथ,

संदर्भ :- या कार्यालयाने दिलेली बांधकाम परवानगी जा.क्र.कुबनप/ नरवि/ बांप /७८२५-९६ दि.२६/१०/२०१६

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये गट.नं.१२ हि.नं.१ पैकी, मौजे सोनिवली ता.अंबरनाथ या भूखंडावर बांधकाम परवानगी दिलेली आहे. सदर भूखंडावरील बांधकामाबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने , सदर जागेचे व सुरु असलेल्या बांधकामाचे ठिकाणी स्थळनिरीक्षण केले असता, सुरु असलेले बांधकाम हे मंजूर नकाशाप्रमाणे नसल्याचे दिसून आलेले आहे. बांधकाम परवानगीनुसार आवश्यक सामासिक अंतर न सोडताच आपण बांधकाम सुरु ठेवल्याचे दिसून आले आहे. तसेच रो हाऊस करीता आवश्यक सामासिक अंतर व रो हाऊस च्या स्थितीमध्ये पूर्वपरवानगीशिवाय बदल केलेला आहे. आपले सुरु असलेले बांधकामात कामगारांच्या सुरक्षेकरीता "सुरक्षा जाळी" अथवा तत्सम सुरक्षा यंत्रणा सुध्दा दिसून आली नाही.

तरी आपण दिलेल्या बांधकाम परवानगी मधील अट क्र.७,८,१२,४०,६१ इत्यादीचे उल्लंघन केले असल्याने आपण सदर जागेवर सुरु केलेले बांधकाम त्वरीत थांबवावे. तसेच याबाबतचा खुलासा पत्राच्या दिनांकापासून ५ (पाच) दिवसांत करावा.

अन्यथा आपण महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ मधील तरतुदीअन्वये पुढील कायदेशीर कारवाईस पात्र असाल याची नोंद घ्यावी.

बदलापूर नगरपालिका, जिल्हा ठाणे - कुळगांव

मुख्याधिकारी
कुळगांव-बदलापूर नगरपरिषद
कुळगांव.

D:\K\Extra\NOTICE\NOTICE- ritesh mishra-.doc

Scanned by CamScanner